**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

## प्रेसनोट दिनांक – २३/०४/२०२४

**दि. २२/०४/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली २३३/२०२४ भा.दं.वि. कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४६, १४७, १४८,१४९, क्रिमीनल लॉ ॲमेंडमेंट ॲक्ट कलम ७, मुंबई पोलिस अधिनियम कलम ३७(१)(३) प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २१/०४/२०२४ रोजी १७/३० वा.चे.सुमारास कोहीनुर कॉलनी,आक्सा सोसायटीचे मागे,जाधववाडी चिखली पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि २२/०४/२०२४ रोजी ०८.४८ वा |
| फिर्यादी | :- | इरफान मोहम्मंद खान वय ३४वर्ष, धंदा-व्यवसाय,<br>रा.स्वराज्य सोसायटी, व्ही विंग, प्लॅट नंबर ४०८, जाधववाडी चिखली पुणे |
| आरोपी | :- | १)समशुददीन खान रा.कोहीनुर कॉलनी, आक्सा सोसायटीचे मागे, जाधववाडी चिखली पुणे<br>२)जुबेदा खान, रा.सदर<br>३)कुतबुददीन खान,रा.सदर<br>४)समीउद्दीन उर्फ समसु झिनकु खान वय १८ वर्षे रा सदर<br>५)रियाज उददीन खान,रा.सदर<br>६)आझारउददीन खान रा.सदर<br>७)शहाबुद्दीन झिनकु खान वय २३ वर्षे रा कोहिनुर कॉलनी अक्सा एमपायर सोसा पाटीमागे जादववाडी चिखली पुणे<br>८).उस्मान नशीबउल्ला खान वय २० वर्,षे रा सदर<br>**आरोपी क्र.४ ,७ ,८ अटक आहेत** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची बहीण नामे कायनात नदीम खान हिचा लहान मुलगा आहात हा घराबाहेर खेळत असताना वरील आरोपी नंबर १ यांचा लहान मुलगा तसलिम यांने मारल्याने त्यांचा जाब विचारण्यासाठी फिर्यादी यांची बहीण कायनात व फिर्यादीचे दाजीचा भावाचा मुलगा वाहीद असे मिळुन आरोपी क्रं १ यास विचारण्याकरीता गेले असता त्यां दोघांना आरोपी नंबर १, २ यांनी मिळुन शिवीगाळ करुन हाताने मारहाण केली त्यावेळी फिर्यादीचे बहीणीने फिर्यादीस संपर्क करुन घटनास्थळी बोलावुन घेवुन त्यांना झाला प्रकार सांगीतला त्यावेळी फिर्यादी व त्याची बहीण तसेच ड्रायव्हर सलमान खान व वाहीद खान असे मिळुन ओरोपी नं.१, २ यांना समजाविण्यासाठी गेले असता आरोपी नंबर १, २ यांनी फिर्यादी यांना व त्यांची बहीण नामे कायनात भाउ कामरान व ड्रायव्हर सलमान खान यांना शिवीगाळ करुन आरोपी नं.१ यांने मै अभी तुमको दिखाता हुं” असे म्हणुन घरातुन लाकडी दाडका आणुन तो फिर्यादी याचे डावे पायाचे पोटरीवर मारला. तेवढयात तेथे आरोपी नंबर २, ३, ४, ५ व ६ असे सर्वजण पळत पळत आले व त्यांनी फिर्यादी व त्यांचा भाउ कामरान, बहीन कायनात, व ड्रायव्हर सलमान खान यांना शिवीगाळ करुन लाथाबुक्क्याने मारहान करुन आरोपी क्र ६ यांने फिर्यादी यांचा भाउ कामरान यांस लोखंडी कोयत्याने पोटावर मारुन गंभीर जखमी केले तसेच आरोपी क्र ४ यांने त्यांचे हातातील लोखंडी कोयत्याने फिर्यादी चा भाउ कामरान यांचे डोक्यात डाव्या बाजुने मारुन गंभीर जखमी केले.तसेच फिर्यादी यांचा ड्रायव्हर सलमान खान यांस आरोपी क्र ३ यांने त्याचेकडील लोखंडी कोयत्याने डावे बाजुचे बरगडीवर व आरोपी क्र ५ यांने कोयत्याने कपाळावर मारुन जखमी केले त्यावेळी तेथे एक पांढ-या रंगाची कार आली व त्यामधील चार आरोपी (नाव पत्ता माहीत नाही) हे फिर्यादी यांचेकडे पळत आले व त्यांनी फिर्यादी यांचे दाजीच्या भावाचा मुलगा वाहीद यांस लाथाबुक्कयानी मारहाण करुन, त्यामधील एकाने त्यांचे हातामधील लोखंडी कोयत्याने वाहीदच्या डोक्यास मारुन त्यास गंभीर जखमी केले. तेव्हा फिर्यादी यांनी आरडाओरडा केला असता,त्यांना आरोपी क्र ४ यांने त्यांचेकडील लोखंडी कोयत्याने त्यांचे कपाळावर व पोटावर उजवेबाजुला मारुन मला गंभीर जखमी केले व आरोपी क्र ३ यांने दगडाने फिर्यादीचे डावे हाताचे पंजावर मारुन जखमी केले त्यावेळी फिर्यादी त्यांना ढकलुन तेथुन पळुन जावु लागलो असता त्यांना आरोपी क्र १ यांने |

त्यांचेकडील लाकडी दांडक्याने फिर्यादी यांचे डोक्यात मारुन त्यांना गंभीर जखमी केले आहे.म्हणुन

| | | |
|---|---|---|
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि न्यामणे ९९२३४५५१११ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण २७१/२०२४ भा.दं.वि कलम ३२६,३२४, ५०४,३४ म.पो.का.क ३७ सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२१/०४/२०२४ रोजी २३/२० वा चे सुमारास मौजे चाकण गावचे हद्दीत हॉटेल आनंद ढाब्या जवळ हिल टॉप हॉटेलचे पाठीमागे चाकण ता खेड जि पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२२/०४/२०२४ रोजी ०७.१७ वा |
| फिर्यादी | :- | प्रचित महेंद्र धुमाळ वय २२ वर्ष धंदा हॉटेल व्यवसाय राहणार मुपो पेठ ता आंबेगाव जि पुणे |
| आरोपी | :- | १)पियुष धाडगे पूर्ण नाव माहित नाही राहणार चाकण तालुका खेड जिल्हा पुणे,<br>२) परवेज मुल्तान शेख वय ३४ वर्षे रा एस एस टायर्स तळेगाव रोड चाकण वाईन्स चे बाजुस पिउष धाडगे यांचे भाड्याचे गाळ्यात चाकण ता खेड जि पुणे ३)एक पांढरा रंगाचा शर्ट घातलेला इसम नाव पत्ता माहित नाही व ०४)त्याचे मित्र<br>**आरोपी क्र २ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी यांनी तु परवेज शेख याला जेवणाचे पार्सल दिले नाही या कारणावरून हातात लोखंडी रॉड लाकडी काठी घेऊन फिर्यादीचे डोक्यात तोंडावर पाठीत खांद्यावर उजव्या हातावर मारहाण करून फिर्यादीचे डोक्यात गंभीर दुखापत केली आहे म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि कातकाडे ९६८९९०७०८६ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एमआयडीसी २५९/२०२४ भा.द.वी. कलम २७९, ३३७,३३८, मो.वा.का. १८४, १३४ (अ)(ब) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२१/०४/२०२४ रोजी १९/३० वा. सुमारास कुरुळी गावचेहद्दीतील वसुंदरा हॉस्पीटल समोरीलचाकण– पुणे हा रोडवर |
| गुन्हा दाखल | :- | दि.२२/०४/२०२४ रोजी १७/२९ वा |
| फिर्यादी | :- | श्रीशल गंगाधर जमादार वय ५८ वर्ष धंदा- खाजगी काम रा. कुदळेवस्ती मोशी ता.हेवली जि.पुणे |
| आरोपी | :- | अज्ञात वाहना वरील चालक |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी सी.टि. १०० गाडी क्र. एम.एच.१४ जे.सी.७००४ या गाडीने चाकण येथुन मोशी येथे जात असताना बर्गेवस्ती फाट्या जवळील वसुंदरा हॉस्पीटल समोरील चाकण पुणे हायवे रोडवर कोणत्यातरी अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने लापरवाहीने व भरधाव वेगाने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला पाठी मागुन धडक देवुन अपघात केला सदर अपघाता मध्ये फिर्यादी मोटार सायकलसह खाली पडुन फिर्यादीचा डावा पाय गुडघ्यामध्ये फॅक्चर झाला असुन डावा हात पंजामध्ये फॅक्चर झाला असुन गंभीर दुखापत झाली आहे. तसेच तोंडाला मार लागुन तोंडामधील ४ दात पडले असुन तोंडाला पंण गंभीर दुखापत होण्यास कारणीभुत झाला असुन सदर अपघात करणारा अज्ञात वाहना वरील चालक फिर्यादीला उपचारकामी हॉस्पीटल मध्ये घेवुन न जाता तसेच अपघाता बाबतची माहीती पोलीसांना न देता तो त्याचे वाहन घेवुन पळुन गेला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि पानसरे ९४०३५३६९५८ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ५०५/२०२४ भा.द.वि. कलम ४०९,४२०, ४०६,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ०१/१२/२०२३ रोजी १०/०० वा पासुन ते आज दि २२/०४/२०२४ रोजी ०८/०० वा पर्यत ड्रीम्स कार शोरुम, बडोदा बँके जवळ, काळेवाडी फाटा, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि २२/०४/२०२४ रोजी १० /४०वा |

फिर्यादी :- गजानन रुस्तुमराव ढोरे वय ४१ वर्षे धंदा नोकरी रा. स्नेहनगर, वसमत, ता. वसमत जि. हिंगोली

आरोपी :- १)अजित कुलाळ, वय-५० वर्ष
२)शुभम पाटील वय- ३५ वर्ष
३)संदिप काकडे, वय- ४५ वर्ष
४)रविंद्र राठोड वय- ३५ वर्ष
५)प्रज्ञा नावाची मुलगी तसेच त्यांचे इतर साथीदार
सर्व रा. ड्रिम्स कार, बडोदा बँके जवळ, काळेवाडी फाटा, पुणे
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी त्यांची व्होक्स वॅगन व्हेन्टो गाडी नं एम एच १४ ई एच ३८२७ या गाडीची ओएलएक्सवर दि. ०१/१२/२०२३ रोजी विक्रीसाठी जाहीरात टाकली असता ती जाहीरात पाहुन ड्रिम्स कार, बडोदा बँके जवळ, काळेवाडी फाटा, पुणे येथील ड्रिम्स कारचे ऐजेन्ट नमुद आरोपी यांनी संगनमत करुन फिर्यादीशी संपर्क करुन फिर्यादीची गाडी विक्री करण्याचे अमिष दाखवुन सदर गाडीची किंमत ४,२०,०००/-रु ठरवुन त्या गाडीचे मोबादल्यात १०,०००/-रु ऑनलाईन पाठवुन उर्वरित फिर्यादीचे गाडीचे ठरलेल्या व्यवहारा प्रमाणे ४,१०,०००/-रु फिर्यादीस परत दिले नाहीत तसेच सदर रकमेपोटी फिर्यादीस सही मध्ये बदल असलेला चेक दिला असता तो चेक न वटता बँकेतुन परत आला अशा प्रकारे त्यांनी फिर्यादीची गाडी किंवा उर्वरित रक्कम फिर्यादीस परत न देता त्यांची गाडी त्यांचे आर्थिक फायदयासाठी वापरुन त्यांची आर्थिक फसवणुक केली आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि गायकवाड ९५५२५४६१३१

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण २७४/२०२४ एन.डी.पी.एस.ॲक्ट १९८५ चे कलम ८(ब), २०(अ), २०(क) प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २२/०४/२०२४ रोजी १२/३० वा. चे सुमारास मौजे चाकण गावचे हददीत आगरवाडी रोड लगत जमीन गट नं. २७९ मध्ये मक्याचे शेतात ता खेड जि पुणे

गुन्हा दाखल :- दि.२२/०४/२०२४ रोजी १९/०२ वा

फिर्यादी :- नामदेव जयसिंग तलवाडे, वय ३६ वर्षे, व्यवसाय-नोकरी, पोलीस उप निरीक्षक, चाकण पोलीस स्टेशन पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालय

आरोपी :- सदाशिव आप्पासाहेब देशमुख वय ६५ वर्षे, धंदा शेती रा. आगरवाडी रोड, चाकण ता खेड जि पुणे
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी मजकुर याने त्यांचे मालकीचे शेतगट नं. २७९ या गटातील शेतामध्ये मक्याचे पिकामध्ये हिरवट रंगाचे ओलसर उग्र वास येत असलेली बोंडे येत असलेली गांजा या अंमली पदार्थाची सुमारे पाच ते दहा फुट उंचीची छोटी - मोठी एकुण ६६ झाडे त्याचे एकुण २३ किलो वजन असलेले ११,५०,०००/- रुपये किंमतीची गांजा या अंमली पदार्थाची झाले अनाधिकाराने, बेकायदेशिर रित्या कब्जातील शेतामध्ये लावलेली असतांना मिळुन आला आहे.

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि ज-हाड ८३०८७८९००

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ५१२/२०२४, भा. द. वि. कलम ३५३,३३२, ५०४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. २२/०४/२०२४ रोजी १९.०० वा चे सुमारास समता कॉलनी धनगरबाबा मंदीरामागे थेरगांव पुणे

गुन्हा दाखल :- दि. २२/०४/२०२४ रोजी २३/५७ वा

फिर्यादी :- मच्छिंद्र हरिकिसन व्हरकटे वय ३३ वर्षे, पोलीस अंमलदार २३६९ वाकड पोलीस ठाणे. पिंपरी चिंचवड

आरोपी :- सुरज चंद्रकांत कु-हाडे वय २२ वर्षे रा. समता कॉलनी धनगरबाबा मंदीरामागे थेरगांव पुणे
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- वर नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी आम्ही थेरगांव मार्शल स्वतः व सोबत दिनकर पोंदकुले पोहवा १४७१ असे इसम नामे विलास कांबळे याचे मदतीला गेलो असता विलास कांबळे यास चाकून जखमी केलेला मुलगा नमुद

आरोपी यास तु पोलीस स्टेशनला चल असे म्हणालो. त्यावेळी त्याने आम्हाला शिवीगाळ करुन तेथून पळून जावू लागला. त्यावेळी फिर्यादी व दिनकर पोंदकुले असे आम्ही त्यास पकडले. त्यावेळी त्याने फिर्यादीचे डाव्या हाताला जोराने चावा घेवून फिर्यादीला जखमी केले. तसेच आमचे मदतीला आलेल्या काळेवाडी मार्शलचे अंमलदार २१३४ सत्यनारायण पिल्लामारी यांना उजव्या दंडाला जोरात चावा घेवून जखमी करुन आम्ही करीत असलेल्या सरकारी कामामध्ये अडथळा निर्माण केला. म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि नलावडे ९५५२५२०१९३

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिखली २३५/२०२४ भादवि.कलम ३२६,३२४, ३२३,५०४, ५०६,१४३, १४६,१४७, १४८,१४९. क्रिमीनल लॉ ॲमेंडमेंट ॲक्ट कलम ७, मुंबई पोलीस अधिनियम कलम ३७ (१) (३) प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २१/०४/२०२४ रोजी सांयकाळी ०६/३० वा ते ०७/०० वा चे दरम्यान कोहिनुर कॉलनी, अक्सा एम्पायर सोसायटी जवळ, जाधववाडी चिखली पुणे

गुन्हा दाखल :- दि २२/०४/२०२४ रोजी ०९.५३ वाजता

फिर्यादी :- शहाबुद्दीन झिनकु खान , वय २३ वर्षे, धंदा - फर्नीचर रा. कोहिनुर कॉलनी, अक्सा एम्पायर सोसायटीचे पाठीमागे, जाधववाडी चिखली पुणे मुळगांव ग्राम पिरैला थाना इटवा जि.सिध्दार्थनगर उत्तरप्रदेश

आरोपी :- १)इरफान खान २)कमरान खान,
३)वहिद खान,
४)अल्ताफ तसवर अली खान वय ३६ वर्षे रा कोहिनुर कॉलनी अक्सा अम्पाअर सोसा जवळ जाधववाडी चिखली पुणे
५)वसिम रईस खान वय २१ वर्षे रा बालघरे वस्ती कुदळवाडी चिखली पुणे
६) रिजवान मन्नोवरनुल्ला खान वय ३६ वर्षे रा लकी गॅरेज पाठीमागे एकता वजन काटयाजवळ कुदळवाडी चिखली पुणे
**आरोपी ४,५ ,६ अटक आहेत**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे शेजारी राहणारी आरोपी क्र १ यांची बहिण नाव पत्ता माहित नाही ही दोन महिलेसोबत फिर्यादीचे घरी येवुन लहान मुलांचे क्रिकेट खेळण्यावरुन त्यांचेमध्ये वाद झाल्याचे कारणावरुन फिर्यादीशी वाद करुन शिवीगाळ करीत असताना फिर्यादी यांचेमध्ये बाचाबाची चालु असताना, त्यातील एका महिलेने फोन करुन सदर बाबत आरोपी क्र १ यास सांगितल्याने आरापी क्र १ याने त्याचे सोबत आरोपी क्र २ ते ४ व इतर ५ ते ६ इसमांना घेवुन येवुन फिर्यादीचे भाऊ कुदबुद्दीन झिनकु खान यास लाठी, लोंखडी पाईप व कोयत्याने डोक्यात, पायावर हातावर मारहाण करुन गंभीर जखमी केले. तसेच इतरांनी ही फिर्यादीस त्याचे भाऊ अझरुददीन खान, समीउद्दीन खान, वहिनी फरिदा खान यांना लाकडी काठी, लोंखडी पाईप ने मारहाण करुन जखमी करुन जीवे ठार मारण्याची धमकी देवुन शिवीगाळ केली आह

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि न्यामणे ९९२३४५५१११

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण २७२/२०२४ भादवि कलम ३२३, ३२४, ५०४ म पो का क ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २१/०४/२०२४ रोजी २३.२० वा मौजे चाकण गावचे हददीत हॉटेल आनंद ढाब्याजवळ हिल टॉप हॉटेलचे पाठीमागे चाकण ता खेड पुणे

गुन्हा दाखल :- दि.२२/०४/२०२४ रोजी ०९.२८ वा

फिर्यादी :- परवेज महंमद शेख वय ३४ वर्षे रा मयुर हॉटेल च्या बाजुला तळेगाव चौक चाकण ता खे पुणे

आरोपी :- प्रचित महेंद्र धुमाळ रा पेठ ता खेड पुणे

| | | |
|---|---|---|
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी पार्सल मागितले असता तेथील ढाबा मालक नमुद आरोपी यांनी फिर्यादी यांना कशाचे पार्सल तु पैसे जमा केले आहे का असे म्हणुन चिडुन तु पार्सल चे पैसे दिले नाही असे म्हणुन फिर्यादी यांना शिवीगाळ करु लागला व फिर्यादी ंयाना हाताने मारहाण करु लागला तेथे हॉटेलमध्ये मटण बनविण्यासाठी असलेला लोखंडी चमचा हातात घेवुन आला व चमच्याने फिर्यादीचे दोन्ही हाताचे दंडावर डावे बाजुच्या कमरेवर तोंडावर डोक्यावर लोखंडी चमच्याने मारुन जखमी केले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा रेंगडे ९९२२४३५९५३ |